# एक नवीन पहाट

१ जानेवारी, २०१८

आत्मीय साधकजन,

नूतन वर्षाभिनंदन!

आजची पहाट काही विशेष आहे — नववर्षाचा सूर्याने धरेवर स्वतःला अशा रितीने प्रसृत केले आहे की, ज्यामुळे सोनेरी सरितांची निर्मिती झाली आहे. काही खास असे आहे त्या उधळलेल्या रंगांमध्ये, ज्यांना दिव्य चित्रकारांनी आपल्या उदार हृदयाने संपूर्ण आकाशात मुक्तहस्ते उधळून दिले आहे : लाल, गुलाबी, थोडासा जांभळा, अधिकतर सोनेरी रंग. कदाचित तुमच्या आकाशात तुम्ही काही ढगदेखील पाहिले असतील — महाकाय, आंतर प्रकाशाने उजळलेले मखमली मेघ जे सूर्यदेवतेच्या आसपास अतिशय स्थिरतेने गस्त घालत आहेत. किंवा कदाचित तुम्ही मऊसूत धुकेही पाहिले असेल जे सूर्याबरोबर कधी इकडे तर कधी तिकडे अशा रितीने फिरत लपाछपीचा खेळ खेळते आहे.

नववर्ष दिनाचा सूर्योदय मी जेव्हा पाहते, तेव्हा मला माझ्या सद्‌गुरू, गुरुमाई चिद्विलासानंद यांचे स्मरण होते. मला खात्री आहे, तुमच्या निदर्शनास हे आले असेल की, सूर्यप्रकाशाने उजळून गेलेल्या आकाशाकडे तुम्ही जेव्हा पाहता, आणि माझ्या म्हणण्याचा आशय असा आहे की, तुम्ही त्याला 'खरोखरच' आपल्या अंतरात जेव्हा सामावून घेता, त्याच्या हलक्याशा उबेला तुम्ही जेव्हा तुमच्या अंतरात झिरपू देता आणि आपल्या दृष्टीला आकाशाच्या सोनेरी प्रभेचे अंजन लावता, तेव्हा सर्वकाही कसे अगदी प्रशांत होते. जगातील सर्वकाही रास्त आणि योग्यच आहे असे वाटते. तुम्ही नव्याने मोकळा श्वास घेऊ शकता.

आंतरिक विसाव्याची ही भावना, आपल्या सभोवतीच्या जगातील समतोलाची ही अनुभूती, अशी भावना आहे की, जिचा संबंध मी तत्काळ गुरुमाईंच्या उपस्थितीशीच लावते. गुरुमाईंची उपस्थिती, गुरुमाईंची कृपा आणि गुरुमाईंच्या शिकवणी मला पुन्हापुन्हा या भावनेकडे, समतोलाच्या या अनुभूतीकडे घेऊन जातात.

आणि म्हणून मी जेव्हा प्रातःकालीन आकाशाच्या नारिंगी रंगाच्या प्रभेला पाहाते, खास करून आजच्यासारख्या विशेष दिवशी, तेव्हा मला संपूर्ण आकाशात एक भगवा अंगरखा फडकत असलेला दृष्टीस पडतो. गुरुमाईंच्या सुहास्याची कल्पना मी करू लागते — ते सुहास्य त्यांच्या नेत्रांमध्ये किती

स्पष्टपणे प्रकट होते, कसे त्यांचे सुहास्य प्रेम व्यक्त करते आणि हे सांगते की, त्या सर्वकाही जाणतात, त्या सर्वकाही समजतात. गुरुमाईंचे हास्य माझ्या कानांमध्ये गुंजत राहाते. मला त्या छोट्याछोट्या नाजूक क्षणांचे स्मरण होते ज्यांना माझ्या मनाने गुंफले आहे आणि स्मृतीमध्ये संग्रहित करून ठेवले आहे : दर्शनाला आलेल्या एका साधकाचा हात गुरुमाईंनी अत्यंत सौम्यपणे आपल्या हातात घेतला होता. त्यांच्या या कृतीतील करुणा आणि आस्था इतकी स्पष्ट होती, मनाला इतकी खिळवून टाकणारी होती की, तिला शब्दांमध्ये मांडणे माझ्यासाठी अवघड आहे. काही आठवड्यांपूर्वीचा तो क्षण, जेव्हा गुरुमाईंनी बडे बाबांच्या पादुकांवर गुलाबाच्या फुलांच्या पाकळ्या वाहिल्या होत्या, त्या वेळी त्यांच्या हातून होणारी पुष्पवृष्टी एका अनवरत वाहणाऱ्या झऱ्यासारखी प्रतीत होत होती. त्यांनी एकदा एका मांजराला कसा धीर दिला होता, जेव्हा त्याला पायऱ्या चढण्याची भीती वाटत होती. त्यांनी त्या मांजराला आपल्या कुशीत घेऊन त्याला जोजवले आणि हळूच सांगितले, “काही हरकत नाही, सर्वकाही ठीक आहे. काही हरकत नाही, सर्वकाही ठीक आहे.” त्यावेळी त्यांच्या आवाजात किती मृदुलता होती.

मी एकटक आकाशाला पाहाते आहे, माझे अंतःकरण संपूर्णतः द्रवीभूत होण्याच्या काठावर आहे, आणि अंतरात कुठेतरी मला हे ज्ञात होते आहे की, मी जर लक्ष दिले, तर गुरुमाईंची कुठलीही शिकवण — जसे की त्यांचा एखादा शब्द, त्यांची एखादी कृती किंवा आविर्भाव — माझ्या स्वतःच्याच एका सूर्योदयाला उजागर करेल.

हे त्याप्रमाणेच आहे, जसे की भारताच्या महाराष्ट्रातील, तेराव्या शतकातील लोकप्रिय संतकवी ज्ञानेश्वर महाराज, श्रीभगवद्गीतेवर लिहिलेल्या त्यांच्या टीकेत सांगतात :

जें जया वाटा सूर्यु जाये। तेउतें तेजाचें विश्व होये।

सूर्य आपल्या मार्गावर जिथे कुठे जातो, तेथे संपूर्ण विश्व प्रकाश होते.[१]

आज, ‘एक मधुर सरप्राइझ्’ सत्संगात आपण वर्ष २०१८ साठीचा गुरुमाईंचा संदेश प्राप्त केला. नववर्षासाठी ही गुरुमाईंची शिकवण आहे. आपल्यासाठी हे असे ज्ञान आहे ज्याला आपल्याला कार्यान्वित करायचे आहे, हा एक दृष्टिकोन आहे ज्याच्याद्वारे आपण या जगतातील आपल्या स्थानाला अधिक चांगल्या तऱ्हेने जाणून घेऊ शकतो. अंततः त्यांचा संदेश आपणातील प्रत्येकासाठी श्रीगुरूंच्या अमर्याद प्रेमाची अभिव्यक्ती आहे — त्यांच्या या करुणामयी इच्छेची अभिव्यक्ती आहे की, आपणा सर्वांना ज्या उत्तरांची व ज्या परिपूर्णतेची व प्रगाढ शांतीची आस आहे तिला आपण प्राप्त करू शकावे.

मी सिद्धयोग मार्गाचे अनुसरण करतच मोठी झाले. प्रत्येक वर्षाच्या जानेवारी महिन्यात आमचे कुटुंब गुरुमाईंचा त्या वर्षासाठीचा संदेश ऐकत असे. मला अजूनही आठवते की बालपणी मला असे वाटायचे, की गुरुमाईंचा संदेश फक्त माझ्यासाठीच आहे. खरेतर व्यावहारिक स्तरावर मी हे जाणून होते की तो संदेश सगळ्यांसाठी समान रूपाने आहे, तरीदेखील मला वाटायचे की तो फक्त माझ्यासाठीच आहे, माझ्यासाठी उचित आहे. माझ्यासाठी बनवलेला आहे, एक असा प्रेमपूर्ण संदेश की जो गुरुमाईंच्या हृदयातून सरळ माझ्या हृदयापर्यंत पोहोचतो आहे. हे ते शब्द होते जे केवळ माझ्यासाठी होते, ज्यांचा आश्रय मी वर्षभर घ्यायचे, ज्यांच्याविषयीची माझी समज मी माझ्या रोजनिशीत लिहायचे, उदास असताना ज्या शब्दांना मी हृदयापाशी धरून ठेवायचे किंवा आनंदाच्या क्षणी मी त्यांच्यामुळे उल्लसित होत असे. आणि वर्षानुवर्षे मी हे असे करत आले आहे. गुरुमाईंचा संदेश माझ्या जीवनात घडत राहिलेल्या प्रत्येक परिस्थितींना नेहमीच लागू पडत आला आहे. गुरुमाईंचा संदेश मला नेहमीच मार्गदर्शन प्रदान करतो. तो मला नेहमीच दिलासा देतो आणि प्रगती करण्यासाठी सहाय्य करतो.

गुरुमाईंच्या संदेशाविषयी जी गोष्ट मला सर्वात जास्त आवडते, जर तिचा उल्लेख करणे शक्यसुद्धा झाले तर मी असे सांगेन की जेव्हा आपण संदेश आचरणात आणतो, आपण त्याला जेव्हा आपल्या जीवनाशी एकजीव होऊ देतो आणि आपल्या जीवनाला निर्देशित करू देतो, तेव्हा तो आपल्याला परत आपल्या स्वतःच्या संपर्कात घेऊन येतो. निश्चितपणे हे असे घडतेच. नववर्षाच्या वेळी आपल्यातील अनेक जणांची मनीषा असते की, आपण पुन्हा नव्याने आरंभ करावा. आपल्याला स्वतःतील उत्साहाला नव्याने पल्लवित करावयाचे असते; पुन्हा एकदा आपल्याला एक अशी नवीन एखादी गोष्ट आजमावून पाहायची असते की, जी पूर्वी आपण करू शकलो नव्हतो. परंतु प्रत्यक्षात आपण जेव्हा हे करू लागतो, तेव्हा कदाचित आपल्याला हे माहीत नसते की सुरुवात कुठून करावी. कदाचित आपण असाही विचार करू लागतो की आपले लक्ष्य आपल्या सामान्य आकलनापलीकडील आहे आणि म्हणून ते मिळवण्यासाठी आपल्याला स्वतःच्या चौकटीबाहेर पाऊल टाकावे लागेल.

गुरुमाईंचा संदेश आपल्याला परत त्या प्रज्ञानाकडे, चांगुलपणाकडे आणि दिव्यत्वाकडे आणतो, जे इथेच आपल्या अंतरात विद्यमान आहेत. गुरुमाईंच्या संदेशाला आपण जेव्हा आपल्या जीवनाचे एक अंग बनवतो, तेव्हा निश्चितच आपण नवीन बनतो; हा गेल्या काही वर्षांतील माझा अनुभव आहे. पण इथे नवीन होणे म्हणजे एका नवीन दृष्टीने स्वतःकडे पहाणे, नवीन दृष्टिकोनातून हे पाहाणे की, ते काय आहे जे करू शकण्यास व देण्यास आपण सक्षम आहोत —आणि मग त्यानुसार बदल करण्यासाठी दृढ निश्चयाने निर्णय घेणे.

म्हणून तुम्ही जेव्हा गुरुमाईंचा २०१८चा संदेश ग्रहण कराल — तुम्ही जेव्हा ही अमूल्य भेट ग्रहण कराल, तेव्हा यासमवेत 'राहण्यासाठी' मी तुम्हाला प्रोत्साहित करते. याच्या सान्निध्यात रहा. या संदेशाला तुमच्या हृदयात घर करू द्या; त्याला तुमच्या संपूर्ण अस्तित्वात वास्तव्य करू द्या. संदेश तुम्हाला जेथे नेईल, तेथे त्याच्यासोबत वाटचाल करा. तुमच्या स्वतःविषयी तो तुम्हाला कोणती शिकवण देतो आहे, तो कोणते गीत गातो आहे आणि त्याने कोणता ठेका धरला आहे याचे नीट अवलोकन करा. मला असे वाटते आहे की तुम्ही जर बारकाईने पाहिलेत, तुम्ही जर लक्षपूर्वक ऐकलेत, तर कदाचित तुम्ही त्याला प्राप्त करालच : त्या सूर्याला, जो तुमच्या अंतरात उदित होतो आहे.

नुकतेच गुरुमाईंनी मला सांगितले की, वर्ष २०१८ आणि अनंतत्व यांच्यामध्ये एक नाते आहे. कदाचित या नात्याची एक खूण तुम्ही टिपलीच असेल आणि जर नसेल . . .  तर माझा विश्वास आहे की, तिचे आकलन तुम्हाला होईल. फक्त इंग्रजी अंक 2018 याकडे पाहात रहा. ☺

मला हा विचार खूप आवडतो की २०१८ अनंत आहे, याच्या घड्यांमध्ये याने अनंत संभावनांना सामावून ठेवले आहे आणि हेदेखील की आपल्या परिस्थिती कशाही असोत किंवा हे वर्ष आपल्यासाठी काहीही घेऊन येवो, तरीही आपल्या अंतरात एक असा आधार अस्तित्वात आहे ज्याचा आपण आश्रय घेऊ शकतो. प्रगती करण्याची आणि सद्‌भावना वाढवण्याची संधी आपल्यासाठी नेहमीच उपलब्ध आहे. 'अनंतत्व' हा शब्द माझ्यासाठी गुरुमाईंच्या संदेशाचे उत्तम रूपाने वर्णनदेखील करतो. त्यांच्या संदेशामध्ये अपरंपार गहनता आणि अपार शक्ती आहे. आपण त्याचा जितका जास्त अभ्यास करू, तेवढे अधिक आपण याला अनावृत करू व अनुभवू शकू; तसेच तितकेच अधिक आपण हे पाहू शकू की, आपण खरोखर कोण आहोत.

आणि असे करण्यासाठी, तसेच संदेशाच्या अभ्यासासाठी व त्याला आत्मसात करण्यात आपल्या मदतीसाठी सिद्धयोग पथ वेबसाइट हे एक अनमोल साधन आहे. आपण वेबसाइटवर 'गुरुमाईंच्या संदेशाची कलाकृती'चे दर्शन घेण्यासाठी तर अगोदरच आमंत्रित आहोत. आणि 'एक मधुर सरप्राइझ्' सत्संगातील गुरुमाईंच्या संदेश-प्रवचनाचे ऑडिओ वेबकास्टदेखील, ४ जानेवारी, गुरुवारपासून ते २८ फेब्रुवारी, बुधवारपर्यंत आपण ऐकू शकणार आहोत. मी सुरुवातीला म्हणाले होते की, संदेशाच्या सान्निध्यात राहण्यासाठी तुम्ही वेळ काढावा — याहून अधिक चांगले मार्ग कोणते असू शकतात. चला, आपण संदेशाच्या प्रेमळ कुशीत, त्याच्या प्रभेत आणि त्याच्या रंगात पुन्हापुन्हा प्रवेश करू या. चला, आपण संदेशाच्या संगीतात इतके निमग्न होत राहू की, अखेरीस आपल्याला जाणवू लागेल की त्याचे ध्वनितरंग हे आपलेच आंतर ध्वनी आहेत.

या महिन्यात सिद्धयोग पथावर आपण आणखी दोन विशेष अशी पर्वे साजरी करणार आहोत. ७ जानेवारी रोजी, आपण त्या दिवसाचा उत्सव साजरा करणार आहोत, ज्या दिवशी सेहेचाळीस वर्षांपूर्वी बाबा मुक्तानंदांनी आश्रमाच्या दिनचर्येतील सकाळच्या स्वाध्यायात श्रीगुरुगीतेच्या पाठाचा समावेश केला होता. १४ जानेवारीला आपण मकरसंक्रांत साजरी करणार आहोत. या दिवशी सूर्याची उत्तरायण यात्रा सुरू होते, तो समय, जेव्हा अधिकाधिक प्रकाशाच्या ऋतूचे आगमन होते. मला मकरसंक्रांतीच्या बाबतीत हा विचार करणे आवडते की, या वेळी आकाश जणू काही आगामी महिन्यांतील आपल्या साधनेला प्रतिबिंबित करते आहे. “सूर्य आपल्या मार्गावर जिथे कुठे जातो, तेथे संपूर्ण विश्व प्रकाश होते.” संत ज्ञानेश्वरांच्या या अमृतमय शब्दांचे मला पुन्हा एकदा स्मरण होते.

हे सुस्पष्ट आहे की, या महिन्यात आणि या वर्षात असे बरेच काही आहे ज्याची आपण उत्सुकतेने प्रतीक्षा करत आहोत. आणि पुढची वाटचाल करत, वर्ष २०१८मध्ये नवीन स्फूर्तीने, नव्या आशेने आणि सहजतेने पावले टाकत आपण सतत हे स्मरणात ठेवू की, आपण कशा प्रकारे सुरुवात केली होती. आपण कृपेने आरंभ केला आहे — आपण कृपेला ओळखून व तिचे आवाहन करत आरंभ केला आहे. आपण मांगल्यपूर्वक आरंभ केला आहे. आपण उत्तम पद्धतीने आरंभ केला आहे : आपण प्रेमाने आरंभ केला आहे.

आपण २०१८च्या सीमीत क्षणांमध्ये अनंतत्वाची अनुभूती करावी. आपण, या वर्षाच्या प्रत्येक नव्या पहाटेसह श्रीगुरुंच्या कृपेचे स्मरण करावे, ह्या शुभेच्छा.

आदरपूर्वक,

ईशा सरदेसाई
सिद्धयोग विद्यार्थी

[1] ज्ञानेश्वरी, ६.८६; इंग्रजी भाषांतर : स्वामी कृपानंद *Jnaneshwar's Gita* [साउथ फॉल्सबर्ग, न्यूयॉर्क : एस.वाय.डी.ए. फाउंडेशन, १९९९], पृ. ७०.

© २०१८ एस.वाय.डी.ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.